मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.

इमारत बांधकाम परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र

परवानगी नंबर : 92 जा.नं. 92 तारीख 30/07/2013

अर्जदार **श्री. नवकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ.दक्षा मेघराज गोलेच्छा व इतर-२,** व्दारा/-श्री. रितेश कांकरिया,आर्कि., मालेगाव, यास **संगमेश्वर वॉर्ड फायनल प्लॉ.नं. ७८अ/११** मध्ये

फायनल प्लॉ.नं. ७८अ/११ नगर रचना मध्ये मालेगाव क्रं. १

आपले वरील नंबराचे जागेवरील **रहिवासी , तळ व टिपीकल स्टील्ट तळ व पहिला मजला फक्त** नविन बांधकाम करणेस परवानगी /नुतनीकरण बाबत प्लॅनसह अर्ज **ता. २५/०२/२०१३** रोजी रुजू झाला. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ व महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व ६९ अन्वये सोबतच्या नकाशात ---- रंगाने दुरुस्त केलेल्या नकाशा प्रमाणे **बांधकाम परवानगी /नुतनीकरण प्रारंभप्रमाणपत्र देण्यांत येत आहे. मात्र अर्जदारास खालील अटी बंधनकारक राहतील.**

१. सदर प्रमाणपत्र अर्जदारास मिळाले तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. एका वर्षाच्या आत काही कारणास्तव बांधकाम न झाल्यास किंवा अपुर्ण राहिल्यास प्रमाणपत्राचे नतुनीकरण करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४८ अन्वये सदर परवानगी रद्द ठरेल.

२. **सदर प्रमाणत्र दिल्याचे तारखे पासुन एक वर्षा पर्यंत वैध राहील. त्यानंतर प्रत्येक बारा महिन्याचे आंत नुतनीकरण केल्या नंतर तीन वर्षा पर्यंत वैध राहील व तीन वर्षानंतर रद्द समजावी.**

३. सदर प्रमाणपत्र बदल करण्याचा, अट मध्ये वाढ करण्याचा व मंजुर नकाशात बदल करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

४. बिनशेतीची परवानगी महसुल विभागाकडून घेतल्या शिवाय बांधकाम करु नये.

५. बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणेच करावे. बांधकामात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्या शिवाय करु नये.

६. **महानगरपालिकेच्या विकास नियमानुसार बांधकाम असले पाहिजे.**

७. **बांधकामाचा वापर फक्त रहिवास उपयोगासाठी करावयाचा आहे.**

८. **मंजुर नकाशासह सदर प्रमाणपत्र केव्हाही जागेवर उपलब्ध होईल अशी खबरदारी घ्यावी.** महानगरपालिकेच्या अधिका-यांनी अथवा इतर शासकीय अधिका-यांनी मागणी केली असता त्यांना सदर कागदपत्र दाखविणे आवश्यक आहे.

९. अ) जागेवर प्रत्यक्ष बांधकाम चालु करणे पुर्वी जिल्हा निरिक्षक, भुमि अभिलेख खात्या कडून मंजुर रेखांकनाप्रमाणे मोजणी करुन घेणे आवश्यक आहे व सदरचा आखणीचा नकाशा या कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.

ब) अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व जागेवरील खुणा खोटया अथवा दिशाभुल करणा-या असल्यास वा आढळल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यांत येईल.

१०. **जागे संबंधी अथवा बांधकामासंबंधी कोणताही वाद निर्माण झाल्यावर त्यासंबंधी सर्व जबाबदारी तुमच्यावर राहील. बांधकाम फक्त अर्जदारांच्या मालकी हद्दीतच करावे.**

११. बांधकाम सुरु करणे आधी इतर सर्व संबंधीत कायद्याखाली तत्संबंधी घ्यावयाची परवानगी ही सर्वस्वी अर्जदाराची जबाबदारी तुमच्यावर राहील.

१२. **महानगरपालिकेकडून जोत्याचे पुर्णत्व प्रमाणपत्र (Plinth Completion Certificate) घेतल्याशिवाय त्यावरील बांधकाम करता येणार नाही.**

१३. **भारतीय विद्युत अधिनियम व त्याखालील नियमांचे उल्लंघन होणार नाही हयाची खबरदारी घेण्याची जबाबदारी अर्जदारांवर राहील.**

पान नं. २

२२. नियोजित बांधकाम हे भुकंप रोधक करण्याचे दृष्टीने भारतीय मानक संस्थेने निर्देशित केलेल्या मानकानुसार बांधकाम करणे बंधनकारक राहील.

२३. बांधकामाच्या नियोजित जागेतुन विद्युत वाहिनी जात असल्यास बांधकाम करण्यापुर्वी संबंधीत खात्याकडून ती स्थलांतर करुन घेणे बंधनकारक राहील.

२४. बांधकाम नकाशावर दर्शविलेल्या नुसार जल संधारणाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र मिळणार नाही.

२५. सदर भुखंडात कमीत कमी ३० झाडे लावुन त्यांचे जतन व संवर्धन करावे.याकामी भरलेली अनामत रक्कम तीन वर्षानंतर झाडांची स्थिती पाहून परत करण्यांत येईल. झाडाचे संबर्धन योग्य रितीने न झाल्यास अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

२६. सदर बांधकाम परवानगी फक्त जोत्या पर्यंतच मर्यादित राहील.

२७. सदर इमारतीवर अपारंपारिक सौर ऊर्जा संयत्र बसविणे तसेच सौर ऊर्जेवर चालणारे गरम पाण्याचे सयंत्र बसविणे बंधनकारक राहील.

२८. बांधकामासाठी पिण्याचे पाण्याचा वापर करता येणार नाही. बांधकामासाठी लागणा-या पाण्याची स्वतंत्ररित्या व्यवस्था करावी लागेल.

२९. अर्जदारांनी अर्जासोबत दिलेली माहिती खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास बांधकाम परवानगी रद्द करण्यांत येईल.

३०. सदर इमारतीत अग्नीशमन व्यवस्था विकसित करुन त्यास अग्नीशमन विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे.

आयुक्त,
मालेगाव महानगरपालिका,मालेगाव.

प्रत :

१. गृहकर विभाग, प्रभाग क्रं.१, मामनपा.
२. श्री.नवकार डेव्हलपर्स तर्फे भागीदार सौ.दक्षा मेघराज गोलेच्छा व इतर-२, व्दारा/- श्री. रितेश कांकरिया,आर्कि., मालेगाव,
३. मा.जिल्हाधिकारी,नाशिक.
४. म.सहा.संचालक,नगर रचना,नाशिक.

Build.Permmission ४,५,६..

Scanned with OKEN Scanner